



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १४१ * नांदेड * बुधवार, दि. २८ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## जून महिन्यात देशात सामान्यपेक्षा जास्त पाऊस -आयएमडी



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आगामी जून महिन्यात देशात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे, जो दीर्घकालीन सरासरीच्या १०८ टक्के असू शकतो, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) दिली. मान्सूनच्या मुख्य क्षेत्रात मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा आणि लगतच्या प्रदेशांचा समावेश होतो. बहुतेक पाऊस नैऋत्य मान्सून दरम्यान पडतो आणि हा प्रदेश शेतीसाठी मान्सूनच्या पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो.

दरम्यान भारत सरकारने आज प्रगत भारत फोरकास्ट सिस्टीम लाँच केली. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी ते देशाला सुपूर्द केले. ही प्रणाली पंचायत पातळीपर्यंत आपत्ती व्यवस्थापन, शेती, पाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुरक्षेत मदत करेल.

हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले की, मध्य आणि दक्षिण भारतात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. वायव्य भारतात सामान्य पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर ईशान्य भारतात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन यांनी सांगितले की, चालू हंगामात मान्सूनच्या मुख्य क्षेत्रात सामान्यपेक्षा जास्त (दीर्घ कालावधीच्या सरासरीच्या १०६% पेक्षा जास्त) पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. आजपासून भारत फोरकास्ट सिस्टीमचा वापर केला जाईल. आता हवामान अंदाज पूर्वीपेक्षा अधिक स्थानिक आणि अचूक असेल. पूर्वी प्रत्युष हा सुपर कॉम्प्युटर वापरला जात होता, परंतु आता नवीन सुपर कॉम्प्युटर अर्का वापरला जाईल. प्रत्युषला हवामान मॉडेल चालवण्यासाठी पूर्वी १० तास लागत होते, तर अर्का हे काम फक्त ४ तासांत पूर्ण करते. ही प्रणाली ४० डॉप्लर रडारमधून डेटा घेते आणि भविष्यात ती १०० रडारपर्यंत वाढवली जाईल. यामुळे २ तास स्थानिक अंदाज शक्य होतील.

### मुंबईत जोरदार पाऊस

मुंबईत मंगळवारी पावसामुळे बिकट परिस्थिती झाली होती. रेल्वे सेवेवर पावसाचा परिणाम झाला होता. भुयारी मेट्रो स्थानकात पाणी गेले होते. मंगळवारी मुंबईत जोरदार पाऊस झाला. हिंदमाता, किंग सर्कल, दादर, अंधेरी, वांद्रे भागात जोरदार पाऊस झाला. हवामान विभागाने मुंबईसह अनेक जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी केला आहे.

## आता राज्यात शेतजमीन वाटणी दस्ताची नोंदणी फी माफ



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी मुंबईत पार पडली. या बैठकीत सामान्य नागरिक, शेतकरी, शिक्षक, न्यायिक कर्मचारी, दिव्यांग कल्याण, स्थानिक स्वराज्य संस्था अशा अनेक क्षेत्रांना दिलासा देणारे १० महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. विशेषतः शेतीच्या वाटणीसाठी फक्त ५०० रुपये शुल्क आकारण्याच्या निर्णयाने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

यापुढे शेतजमिनीच्या वाटणीसाठी नोंदणी दस्तावर रेडीरेकनरच्या १ टक्के प्रमाणे आकारली जाणारी फी रद्द करण्यात आली असून केवळ ५०० रुपयांमध्ये ही वाटणी होणार आहे. या आधी शेतीच्या वाटणीपत्राच्या दस्तासाठी मोठी रक्कम मोजावी लागायची. महसूल विभागाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

तसेच इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकांना वस्तू व सेवा कर भरपाई अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या बैठकीत मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा, महानगरपालिकांना निधीचा आधार, शिक्षण व न्याय व्यवस्थेत सुधारणा, तसेच दिव्यांग आणि कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त निर्णय असे एकूण समाजातील अनेक घटकांना दिलासा देण्यात आला आहे.

## हदगाव तालुक्यात एका महिलेसह दोन चिमुकल्या पुरात वाहून गेल्या



**हदगाव (प्रतिनिधी)–** अवकाळी पावसाने बामणी फाटा, मनाठा, वरवट परिसरात कहर केला आहे. दि. २७ मे रोजी एक वाजताच्या दरम्यान मनाठा, वरवट परिसरामध्ये अचानक ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. या पावसात वरवट गावाजवळ असलेल्या पुलावरून एक महिला आणि दोन मुली पुरात वाहून गेल्याची घटना घडली आहे.

दि. २७ मे रोजी एक वाजताच्या दरम्यान वरवट येथील सै.अरुणा बळवंत शंकरर्ग (३५), दुर्गा बळवंत शंकरर्ग (८) व समृद्धी विजय शंकरर्ग (८) ह्या आपल्या आईसोबत शेतामध्ये काही कामानिमित्त गेले होत्या. दुपारी एक वाजेच्या दरम्यान मोठा पाऊस सुरू झाल्याने त्या पावसात आपल्या घराकडे निघाल्या असता गावालागत असलेल्या पुलावरून अचानक आलेल्या पुराने तिघी माय-लेक पुरातन वाहून गेल्या. या घटनेची माहिती मिळताच हदगाव तहसीलचे तहसीलदार सुरेखा नांदे, मंडळ अधिकारी तलाठी, मनाठा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक उमाकांत पुणे यांनी घटनास्थळी दाखल झाली. येथे नांदेड येथून अग्निशमक पथकाला पाचारण करून शोधमोहीम सुरू करण्यात आली. पथकाकडून वरवट ते चिखली फुटाणा व चुंचा या भागातील ओढ्यामध्ये व परिसरामध्ये शोधमोहीम सुरू होती. सायंकाळी उशीरा तिघांचाही मृतदेह सापडला आहे. या घटनेने वरवट परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## लातूरमध्ये १३ दिवसांपासून पाऊस सुरूच; अनेक घरात शिरले पाणी

**लातूर (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात गेल्या १३ दिवसांपासून पाऊस सुरू असून शहरातील अनेक भागात पाणी साचलं होतं. अक्षरश: काही भागात, अरुंद गल्लींमध्ये जणून नद्या वाहत असल्याचं पाहायला मिळालं. सोशल मीडियावरही येथील पावसाच्या पाण्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. लातूर शहरात जुना गाव भाग परिसरात या पावसाने प्रचंड नुकसान केलं आहे. जुन्या गाव भागामध्ये देशपांडे गल्ली, राम गल्ली, तेली गल्ली, माळी गल्ली, खडक हनुमान, सेंट्रल हनुमान यांसारख्या भागातील चिंचोळ्या गल्ल्यांमध्ये पावसाचं पाण्याने अक्षरशः नदीचे रूप घेतलं होतं.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या उपस्थितीत आज तिरंगा महारॅली

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या रुपाने मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाबदल कृतज्ञता व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने आज दि. २८ मे रोजी जय जवान जय किसान तिरंगा महारॅली आयोजित करण्यात आली आहे.

यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह इतर मान्यवर रॅलीत सहभागी होणार आहेत. सकाळी दहा वाजता पक्ष कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान ही रॅली असणार आहे, अशी माहिती खा. रविंद्र चव्हाण यांच्यासह, जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

पहलगाम घटनेला प्रतिउत्तर देते भारतीय सैनिकांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी किसान सन्मानाची जोड देत नांदेड काँग्रेसच्यावतीने दि. २८ मे रोजी जय जवान जय किसान रॅली आयोजित करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश सहप्रभारी कुणाल चौधरी, माजी मंत्री अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, नांदेड जिल्हा काँग्रेस निरिक्षक तुकाराम रेंगे पाटील आदी मान्यवर मंडळी या रॅलीत सहभागी होणार आहेत. सकाळी दहा वाजता, नवा मोंढा काँग्रेस पक्ष कार्यालय येथील रॅलीला सुरुवात होईल. आयटीआय, शिवाजीनगर, एसपी कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्ग महात्मा गांधी पुतळा येथे समारोप होईल. यानंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे. यावेळी हजारोंच्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते रॅलीत सहभागी होणार आहेत. अशी माहिती खा. रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

## राष्ट्रवादीचे नेते हरिहरराव भोसीकर यांचे निधन; पानभोसी येथे आज अंत्यविधी

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष हरिहरराव भोसीकर (६८) यांचे मंगळवारी दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी त्यांच्या मूळगावी पानभोसी येथे सकाळी ११ वाजता अंत्यविधी होणार आहे.



राष्ट्रवादी पक्षाच्या स्थापनेपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निष्ठेने कार्यरत हरिहररावांनी अगदी अलीकडे अजित पवारांची साथ धरली. आपल्या एकूण राजकीय कारकिर्दीत त्यांनी अनेक पदे भूषविली. कंधार तालुक्यातील पानभोसी हे त्यांचे मूळ गाव आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या घरात त्यांचा जन्म झाला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते नांदेडमध्ये आले. येथेच त्यांच्यातील राजकीय व्यक्तिमत्त्व फुलले. त्यावेळचे प्रभावशाली नेते बाबासाहेब गोरठेकर आणि गंगाधरराव कुंटूरकर यांच्या संपर्कात व मार्गदर्शनाखाली त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली.

१९८७ साली कंधार तालुका खरेदी-विक्री संघाचे ते अध्यक्ष झाले. या माध्यमातून त्यांचा स्वतंत्र मतदारसंघ तयार झाला. पुढे १९९२ मध्ये जिल्हा परिषदेची निवडणूक लढवून पहिल्याच प्रयत्नात ते विजयी झाले. या संस्थेचे ते कृषी सभापती होते. पुढे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपद भूषविण्याचा मानही त्यांना मिळाला. महाराष्ट्र राज्य को-ऑप हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनचे सलग २२ वर्षे ते संचालक असून या कालावधीत त्यांनी एकदा महामंडळाचे अध्यक्षपदही भूषविले. सध्या ते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष होते. २००२ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या संघटनेत त्यांनी विविध पदे भूषविली. वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये निरीक्षक म्हणून पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. २०२२ मध्ये पक्षात फूट पडल्यानंतर ते अजित पवार यांच्यासोबत गेले. या पक्षात त्यांना प्रदेश उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली.

दरम्यान त्यांना एका दूर्धर आजाराने ग्रासले होते. हळूहळू आजार बळावत गेला आणि दि. २७ मे रोजी दुपारी त्यांची ही झुंज अपयशी ठरली. हरिहरराव भोसीकर यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### सहकार क्षेत्रातील अनुभवी व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड -खा. चव्हाण

नांदेड जिल्ह्यातील वरिष्ठ नेते हरिहरराव भोसीकर यांच्या निधनामुळे राजकीय व सहकार क्षेत्रातील आमचे एक अनुभवी सहकारी काळाच्या पडद्याआड गेले आहेत. संपूर्ण जिल्ह्यात त्यांचा राजकीय पक्षांच्या पलीकडचा वैयक्तिक संपर्क होता. अभ्यासू, संयमी, नम्र आणि सहकार्यास कायम तत्पर असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी जिल्हा परिषद, जिल्हा मध्यवर्ती बँकसह अनेक संस्थांमध्ये त्यांनी दीर्घकाळ महत्वाची पदे भूषविली. भोसीकर कुटूंबियांना या दुःखाला सामोरे जाण्याची बळ ईश्वर त्यांना देवो, असा शोकसंदेश खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केला.

### दुःखद घटना -कमलकिशोर कदम

राष्ट्रवादी काँग्रेसचे, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष तथा हाऊसिंग फायनान्सचे संचालक हरिहरराव भोसीकर यांचे निधन झाले. भोसीकर हे अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे काम जिल्हाध्यक्ष असताना चांगले केले. त्यांच्या निधनाची घटना अतिशय दुःखद असून देव त्यांच्या आत्म्याला शांती देवो आणि त्यांच्या कुटूंबाला हे दुःख सहन करण्याचे देवाने शक्ती द्यावी. असा शोकसंदेश राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवारचे नेते तथा राज्याचे माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांनी व्यक्त केला.

### आमची कौटुंबिक हानी -खा. गोपछडे

नांदेड जिल्ह्याच्या राजकारणात एक जुने जाणते, संयमी आणि अभ्यासू राजकारणी म्हणून दिवंगत हरिहरराव भोसीकर यांची ओळख होती. सहकार क्षेत्रातला जाणता तज्ञ म्हणूनही हरीहरराव भोसीकर यांची कामगिरी सर्वोत्तम राहिलेली आहे. आमचे आणि त्यांचे कौटुंबिक संबंध राहिलेले आहेत. त्यांच्या निधनाने नांदेड जिल्ह्याची आणि आमची मोठी कौटुंबिक हानी झाली आहे, अशी शोक भावना खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केली.

### जिल्ह्याची सामाजिक, राजकीय हानी -आ. चिखलीकर

नांदेड जिल्ह्यातील एक संवेदनशील सामाजिक राजकारणी अशी प्रतिमा निर्माण करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हाध्यक्ष हरिहर भोसरीकर यांच्या निधनाची बातमी धक्का देणारी ठरली. त्यांचे आणि आमचे पारिवारिक संबंध राहिलेले आहेत. पक्षीय राजकारणात ते अनेकवेळा आमच्या विरोधात असले तरी माणूस म्हणून आणि वैचारिक दृष्ट्या एका मित्रासारखे ते कायम राहिले. जिल्हा परिषदेतही आम्ही एकत्रित रित्या काम केले होते. नांदेडच्या राजकारणात त्यांची सतत उणीव भासत राहील अशी भावनिक प्रतिक्रिया आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केली.

### सहकार क्षेत्रातील जाणकार हरपला -आ. कल्याणकर

जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात ३५ वर्षांहून अधिक काळ सक्रियपणे काम करत राहिलेले या क्षेत्राचे जाणते नेतृत्व तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष हरिहरराव भोसीकर यांच्या निधनामुळे नांदेड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सलग तीन वेळा उपाध्यक्ष म्हणून त्यांनी अत्यंत यशस्वीरित्या काम पाहिले आहे. त्यांच्या निधनाने नांदेड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे, अशी शोक भावना आ. बालाजी कल्याणकर यांनी व्यक्त केली.

### नांदेड जिल्ह्याची हानी -आ. बोंढारकर

जिल्ह्याच्या राजकारणात गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून अत्यंत संयमी राजकारणी म्हणून ज्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. ते सहकार तज्ञ तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष, माजी सभापती, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष पद सांभाळले. हरिहरराव भोसीकर यांच्या निधनामुळे नांदेड जिल्ह्याची मोठी हानी झाली आहे, अशी शोक भावना आ. आनंद पाटील बोंढारकर यांनी व्यक्त केली.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# सरकारी दवाखान्यांचं आजारपण, उपचार कोण करणार?

महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांची स्थिती सध्या जशी आहे, तशी एका आरोग्यदायी समाजासाठी लाजिरवाणीच म्हणावी लागेल. 'राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगा'ने नुकत्याच दिलेल्या नोटिशीं-मुळे हे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. या नोटिशी अपवाद वगळता राज्यातील सर्व सरकारी रुग्णालयांना पाठविण्यात आल्या आहेत आणि त्यातून कोट्यवधी रुपयांच्या दंडाची शक्यता निमर्ण झाली आहे. यावरून स्पष्ट होते की, ही यंत्रणा केवळ ठिकठिकाणी उभी आहे, पण तिच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. गरिबांसाठी आरोग्यसेवा देण्याचा दावा करणाऱ्या शासकीय रुग्णालयांचा वास्तवात पर्दाफाश होत आहे. अशा रुग्णालयांत वैद्यकीय सुविधा नाहीत, औषधांचा तुटवडा आहे, स्वच्छतेचा अभाव आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणुसकी हरवलेली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे हेच आश्रयस्थान, पण तिथे त्यांच्याशी होणारी वागणूक ही अत्यंत अमानवी आणि दुर्लक्षित असते. त्यामुळं रुग्ण तिथे शेवटचा पर्याय म्हणूनच जातात. बाकी रुग्ण खाजगी रुग्णालयांचा आसरा घेतात, जरी त्यासाठी कर्ज घ्यावं लागलं तरी चालेल, पण सरकारी दवाखान्यात जाणं टाळलं जातं. नांदेडच्या गुरू गोविंदसिंघ शासकीय रुग्णालयातील मृत्यू प्रकरण अजूनही जनतेच्या स्मरणात ताजं आहे. त्या घटनेत अनेक बालकांचा मृत्यू झाला, आणि त्यामागे व्यवस्थेतील हलगर्जीपणा स्पष्टपणे दिसून आला. डॉक्टरांची अनुपलब्धता, उपकरणांचा अभाव आणि औषधांची कमतरता, या सर्व गोष्टींनी मिळून कितीतरी निरपराधांचे प्राण घेतले. त्या घटनेनंतर राज्यभर संतापाची लाट उसळली होती. पण ते संतापाचे ढग निघून गेले, आणि परिस्थिती पुन्हा नेहमिसारखीच झाली. शासकीय रुग्णालयांतील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना रुग्णालये ही रुग्णांसाठी आहेत. ही स्थिती बदलण्याची जबाबदारी होती लोकप्रतिनिधींची. पण बहुतेक लोकप्रतिनिधीही या परिस्थितीकडे डोळेझाकच करत आले आहेत. एका लोकप्रतिनिधीचा अपवाद वगळता उर्वरित लोकप्रतिनिधी या विषयावर मौन बाळगून होते. यावरून जनतेच्या मूलभूत गरजांची आणि समस्यांची त्यांना किती जाणीव आहे, हे स्पष्ट होते. या पार्श्वभूमिवर राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने उचललेले पाऊल आशेचा किरण वाटतो. २०२३ च्या कायद्यानुसार दिलेल्या नोटिशींमुळे हे कर्मचारी, अधिकारी आणि त्यांचं बेजबाबदार प्रशासन आता काही प्रमाणात तरी शिस्तीत येईल अशी अपेक्षा आहे. या नोटिशी म्हणजे केवळ दंडात्मक कारवाई नाही, तर एक इशारा आहे की, जनतेचा विश्वास गमावलेली व्यवस्था आता स्वतःवर नियंत्रण आणावं. खरं पाहिलं तर ही केवळ कारवाई नव्हे, तर एका नव्या सुरुवातीची संधी आहे. शासकीय रुग्णालयं ही गरिबांची शेवटची आशा असते. त्यामुळे तिथे सेवा उत्कृष्ट असावी, ही केवळ अपेक्षा नाही तर हक्क आहे. डॉक्टर, नर्सेस आणि इतर कर्मचारी हे केवळ पगारासाठी काम करणारे नव्हेत तर ते जनतेचे आरोग्य रक्षक आहेत. त्यांनी ही भूमिका आत्मसात केली पाहिजे. कोणताही रुग्ण हा एका जीवाचा प्रतिनिधी असतो. त्या जीवाच्या मदतीसाठीच ही संपूर्ण यंत्रणा उभी आहे, हे विसरून चालणार नाही. आज आवश्यक आहे ती जबाबदारीच्या जाणिवेची, ताळेबंदाची काटेकोर अंमलबजावणी, आणि मानवी दृष्टिकोनातून काम करणारी वैद्यकीय यंत्रणा. सरकारने केवळ आयोगाच्या नोटिशींवरच समाधान न मानता, दीर्घकालीन सुधारणा योजना आखावी, रुग्णालयांच्या व्यवस्थापनावर स्वतंत्र देखरेख यंत्रणा असावी आणि सर्वसामान्यांची तक्रार ऐकून घेणारी यंत्रणा कार्यान्वित व्हावी. या सर्व प्रकारावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, शासकीय यंत्रणा 'आजारी' आहे, पण तिच्यावर उपचार शक्य आहेत. प्रश्न इतकाच आहे की, हा उपचार त्वरित केला जातो का, की अजून कितीतरी जीव जातात आणि मगच खळबळ उडते? या वेळी कारवाई झालीच आहे, तर ती निर्णायक ठरावी, एवढीच अपेक्षा. कारण हे केवळ रुग्णालयांचे नव्हे, तर समाजाच्या आरोग्याचे आणि माणुसकीच्या श्वासाचे प्रश्न आहेत.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महान देशभक्त



सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भागुर येथे झाला. सावरकरांच्या मनात जन्मापासूनच देशभक्तीची भावना ज्वालामुखीसारखी धगधगत होती आणि जसजसे सावरकर मोठे होत गेले तसतशी स्वातंत्र्यासाठी मशाल प्रज्वलित होत होती. वीर सावरकरांनी लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक व विपीनचंद्र पाल या महान क्रांतिकारक महापुरुषांपासुन प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरू केली आणि क्रांतीचा लढा सुरू ठेवला व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी स्वतंत्र लढ्याच्या कुंडात उडी घेतली.

१८५७ च्या गनिमी संघर्षाच्या विद्रोहाचा अभ्यास केला. त्यावर आधारित एक पुस्तक लिहिले द हिस्ट्री ऑफ व वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स नावाच्या या पुस्तकाने इंग्रज प्रशासनाचे धाबे दणाणले. त्यामुळे हे पुस्तक इंग्रजांनी बेकायदेशीर ठरविले. परंतु सावरकरांच्या गनिमी काव्याने बिहारमध्ये हे पुस्तक लोकप्रिय झाले आणि स्वातंत्र्याची ज्वाला धगधगायला लागली. सावरकर आणि त्याचा भाऊ गणेश यांनी भारतीय परिषद कायदा १९०९ च्या विरोधात निदर्शने केली. यावर इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरविले व अटक वॉरंट जारी केले. अटक होवू नये म्हणून सावरकर पॅरिसला गेले.नंतर १९१० मध्ये सावरकरांना इंग्रजांनी पकडले व न्यायालयाने त्यांना दोषी ठरवून ५० वर्षांची शिक्षा ठोठावली. ४ जुलै १९११ ला काळ्या पाण्याची शिक्षा जाहीर झाली व अंदमान आणि निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये टाकण्यात आले. तेथे त्यांच्यावर इंग्रजांकडून सतत अत्याचार होत होते. परंतु त्यांनी स्वातंत्र्य लढ्याचा धीर सोडला नाही आणि अनेक यातना सहन करीत इंग्रजांना बजावून सांगितले की, मी जिवंत आहे तोपर्यंत देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसेल व आपल्याला भारत सोडून जावे लागेल आणि हे सावरकरांनी सिद्ध करून दाखविले, ही महानता सावरकरांमध्ये दिसून येते. सध्याच्या परिस्थितीत देशातील काही राजकीय पुढारी महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह, विद्वेषक व चिथावणी देणारे विधान करताना दिसतात. ही बाब अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे.

देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते. म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब आक्षेपार्ह विधान करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्र्यपूर्वकाळ अत्यंत खडतर आणि कठीण होता हे सर्वांनाच ठाऊक आहे.त्याकाळी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे संपूर्ण कुटुंब स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होते. महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष, साधु-संत, समाजसुधारक होवून गेले. त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे. तेव्हाच भारत स्वतंत्र झाला. इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले. परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर सुध्दा चढले ही बाब सर्वांनाच ज्ञात आहे.सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील सहकाऱ्यांना व देशभक्तांनाच ज्ञात असावी.परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्वावर कोणी राजकीय पुढारी चीखलफेक करीत असेल व आक्षेपार्ह विधान करीत असेल हे योग्य नाही असे मला वाटते.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि ही शालेय पुस्तके आजची नसून ७७ वर्षे जुनी आहेत. या संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक विचारवंतांनी, थोरपुरुषांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे. तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व स्वातंत्र्यवीर सावरकर नावाने संबोधले जावू लागले. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की, स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही. परंतु परिस्थितीनुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते. यात जहालवादी, मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते. त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे, परंतु मतभिन्नता नव्हती.त्यामुळे सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करणे त्या पद्धतीने सर्वांनी आपआपले योगदान दिले व भारत १९४७ ला स्वातंत्र्य झाला. यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला व त्याचा मृत्यू २६ फेब्रुवारी १९६६ ला झाला. आज त्यांचा मृत्यू होऊन ५८ वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झालीत मग आताच राजकीय पुढाऱ्यांना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ज्ञात आहे. त्यामुळे बाहेरच्या राजकीय पुढाऱ्यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ज्ञान देऊ नये. कारण स्व. इंदिरा गांधींसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा अनेकदा केला आहे ही बाब सावरकरांचा विरोध करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.

थोरमहात्मे, क्रांतिकारक, स्वातंत्र्य सेनानी किंवा आपले पूर्वज ज्यांच्या कर्तृत्वामुळे आपण खुला स्वास घेत आहोत अशांबद्दल अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधान निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी. सध्या देशात विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ रोज शुक्रवारला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला की विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी. त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे. त्यामुळे विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांनी आपल्या जिभेवर आवर घालावा. जोपर्यंत सूर्य-चंद्र-तारे-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत सावरकरांचे व संपूर्ण देशभक्तांचे नाव देशात स्वाभिमानाने घेतले जाईल. स्वातंत्र्यवीर सावरकरांना जयंती निमित्त माझा कोटी कोटी प्रणाम! जय हिंद.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# महिला सक्षमीकरण : मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन

मासिक पाळी हा स्त्रीच्या जीवनाचा एक नैसर्गिक आणि अविभाज्य भाग आहे. ही एक जैविक (म्हणजेच बायलॉजिकल) प्रक्रिया आहे जी प्रजनन क्षमता आणि नवीन जीवनाची सुंदर क्षमता दर्शवते, मासिक पाळी ही स्त्रियांच्या आयुष्यातील नैसर्गिक प्रक्रिया असून यामुळे स्त्रीला मातृत्वाचा अनुभव घेता येतो. मात्र, मासिक पाळी विषयी बर्याच काळापासून अनेक गैर समजांविषयी आपण ऐकलेलं असेलच, आजच्या आधुनिक काळातही योग्य त्या ज्ञानाच्या किंवा माहितीच्या अंमलबजावणीची कमतरता भासून येते.

या संवेदनशील विषयाला समजून घेऊन मासिक पाळीबाबतचे समाजातील गैरसमज दूर करणे गरजेचे आहे, मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन हा सप्ताह अश्या अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी, महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि मासिक पाळीच्या आरोग्याच्या चांगल्या पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे.

सर्वप्रथम, २०१४ मध्ये वॉश युनायटेड ऑफ जर्मनी या एनजीओने मासिक पाळी स्वच्छता दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. हा दिवस दरवर्षी २८ मे रोजी साजरा केला जातो. वास्तविक, हा दिवस निवडण्यामागेही एक कारण आहे. साधारणपणे, बहुतेक महिलांची मासिक पाळी चक्र २८ दिवसांचे असते. त्यामुळेच हा दिवस साजरा करण्यासाठी २८ तारीख निवडण्यात आली.

२८ मे २०२३ ची मासिक पाळी स्वच्छता दिवसाची थीम आहे ' २०३० पर्यंत मासिक पाळी ही जीवनाची सामान्य वस्तुस्थिती बनवणे'आहे , मासिक पाळी मुळे कोणीही मागे हटणार नाही असे जग निर्माण करणे हे मुख्य ध्येय आहे..

theme of Menstrual Hygiene Day 28 may 2023 is "making menstruation a normal fact of life by 2030. goal is to build a world where no one is held back because they menstruate by 2030.'

**जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनाचे महत्त्व**



'जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस' साजरा करण्यामागचा उद्देश तरुण मुलींना आणि महिलांना मासिक पाळीच्या काळात स्वच्छतेची काळजी घेण्यासाठी आवश्यक माहिती देणे, जेणेकरून त्या अनावधानाने कोणत्याही प्राणघातक आजाराला बळी पडू नयेत. मासिक पाळी दरम्यान चांगल्या स्वच्छताविषयक पद्धती सुधारण्यासाठी आणि योग्य अश्या सवाई आमलात आणण्यासाठी, जीवघेण्या आजारापासून बचाव आणि जनजागृती करणे आशे या मागचे महत्त्व आहेत

खेड्यापाड्यात आणि शहरांमध्ये राहणाऱ्या लाखो स्त्रिया आजही यासंबंधीच्या महत्त्वाच्या माहितीपासून अनभिज्ञ आहेत आणि त्यांचा थोडासा निष्काळजीपणा त्यांना मासिक पाळीच्या काळातल्या अस्वच्छतेमुळे गंभीर आरोग्या चे धोके निर्माण होऊ शकतात, जसे की मूत्रमार्गात संक्रमण, भविष्यात वंध्यत्व आणि त्याशी संबंधित इतर आजार , मासिक पाळीची उत्पादने बदलल्यानंतर हात धुण्याकडे दुर्लक्ष केल्याने हिपॅटायटीस बी संक्रमण पसरू शकते. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, योनीमार्गाचा संसर्ग यांसारख्या गंभीर आजार होण्याची शक्यताही वाढते हेही त्यांना माहीत नाही. त्याचा परिणाम महिलांवर केवळ शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही दीर्घायुष्यावर होऊ शकतो. मासिक पाळीबद्दलची भीती, गैरसमज, मौन किंवा ह्या बदल काही बोलाव, प्रश्न विचारावे की नाही आशी दुविधा मनस्थिती बाजूला सारून या काळात चांगली स्वच्छता ठेवली गेली तर महिला आणि मुलींचं खूप मोठ्या प्रमाणावर सबलीकरण होईल याचा प्रचार करण्यासाठी, त्याची आठवण करण्यासाठी २८ मे हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी मासिक पाळी-वर काम करणाऱ्या सगळ्या संस्था, सरकारं, खासगी कंपन्या, प्रसारमाध्यमे आणि व्यक्तींनी एकत्र येऊन काम करत आहेतच हा या मागचा हेतू आहे.जागतिक मासिक पाळी स्वच्छता (28 World Menstrual Hygiene Day) मासिक पाळीतील स्वच्छता आणि व्यवस्थापनाचे महत्त्व, महिलांना भेडसावणाऱ्या आव्हानांची चर्चा करू आणि तरुण मुली व महिलांच्या आरोग्यविषयक धोक्यांची जन जागृती करू आश्या सप्ताह साजरा करण्याचे महत्त्व अधोरेखित होईल अशी मी आशा करते

**मासिक पाळीच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनाचे महत्त्व :** मासिक पाळीच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनामध्ये महिलांचे शारीरिक आणि भावनिक कल्याण सुनिश्चित करण्यासाठी मासिक पाळीच्या दरम्यान वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि संसाधनांचा समावेश आहे. यामध्ये स्वच्छ आणि सुरक्षित सॅनिटरी उत्पादनांचा प्रवेश, मासिक पाळीच्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता सुविधा आणि मासिक पाळीच्या आरोग्याविषयी सर्वसमावेशक ज्ञान यांचा समावेश आहे. जेव्हा स्त्रियांना योग्य मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन उपलब्ध होते, तेव्हा त्या त्यांच्या मासिक पाळीत मर्यादित न राहता निरोगी आणि उत्पादक जीवन जगू शकतात.

**महिलांसमोरील आव्हाने :** दुर्दैवाने, मासिक पाळीच्या स्वच्छता आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत जगभरातील अनेक महिलांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. या आव्हानांमध्ये परवडणाऱ्या आणि दर्जेदार सॅनिटरी उत्पादनांचा मर्यादित उपलब्धता, अपुरी पाणी आणि स्वच्छता सुविधा, सांस्कृतिक आणि सामाजिक निषिद्ध, मासिक पाळीबद्दल ज्ञान आणि जागरूकता नसणे आणि आरोग्यसेवा , मासिक पाळी च्या काळात शिक्षन मर्यादित होत विशेषतः तरुण मुलींन चा समावेश असू शकतो. अशा आव्हानांचा महिलांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि एकूणच कल्याणावर गंभीर परिणाम होतो हे आपण बघतोच.

**मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह साजरे करण्याचे महत्त्व:** संवेदनशील विषयावर मोकळेपणाने संवाद साधण्याची संधी : मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह मौन तोडण्याची आणि मासिक पाळीशी संबंधित कलंक दूर करण्याची संधी प्रदान करते. मासिक पाळीवर खुलेपणाने चर्चा करून, आपण गैरसमजांना आळा घालू शकतो आणि या नैसर्गिक प्रक्रियेभोवतीचे संभाषण सामान्य करू शकतो.

**जागरूकता आणि शिक्षण:** हा आठवडा आपल्याला समुदाय, शाळा आणि व्यक्तींना मासिक पाळीच्या आरोग्य आणि स्वच्छतेबद्दल शिक्षित करण्यास विशेष निमित्त्या देतो. अचूक माहिती देऊन आणि मिथक दूर करून, आपण सर्वजण महिलांना माहितीपूर्ण निवडी करण्यास आणि त्यांच्या मासिक पाळीच्या आरोग्याची काळजी घेण्यास सक्षम करतो.

**संसाधनांमध्ये सुलभता :** मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह हे परवडणाऱ्या आणि टिकाऊ मासिक पाळीच्या उत्पादनांमध्ये सुधारित उपब्धते-नुसार समर्थन करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करू शकते. हे मासिक पाळीच्या आरोग्याला प्राधान्य देण्याची आणि प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि स्वच्छ मासिक पाळीच्या उत्पादनांमध्ये योग्य मार्ग दर्शन करून देण्याची चांगली संधी आहे , याची खात्री करण्यासाठी सरकार, संस्था आणि समुदायांची गरज अधोरेखित करून देते.

**लांचे सक्षमीकरण:** हा आठवडा साजरा करून, आपण स्त्रियांच्या परिवर्तनशील, बहुआयामी आणि सामर्थ्याची कबुली देतो ज्या मासिक पाळीच्या काळात आव्हानांना तोंड देत असतानाही सतत भरभराट करत राहतात

**शाश्वत उपाय:** मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह देखील डिस्पोजेबल सॅनिटरी उत्पादनांसाठी पर्यावरणास अनुकूल पर्यायांना प्रोत्साहन देतो. हे मासिक पाळीचे कप आणि कापड पॅड यांसारख्या पुनर्वापर करण्यायोग्य आणि पर्यावरणास अनुकूल मासिक पाळीच्या उत्पादनांबद्दल जागरूकता वाढवते, जे केवळ कचरा कमी करत नाहीत तर महिलांसाठी दीर्घकालीन खर्चाची बचत देखील करतात.

मासिक पाळी स्वच्छता आणि व्यवस्थापन सप्ताह हे महिलांच्या हक्कांचे समर्थन करण्यासाठी, मासिक पाळीच्या संदर्भात शांतता तोडण्यासाठी आणि महिलांना त्यांच्या मासिक पाळीच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम करण्यासाठी एक शक्तिशाली व्यासपीठ म्हणून काम करते. महिलांना भेडसावणाऱ्या आव्हानांना तोंड देऊन, जागरूकता वाढवून आणि संसाधनांपर्यंत सुधारित उपलब्धतेसाठी प्रोत्साहन देऊन, आपण असे जग निर्माण करू शकतो जिथे प्रत्येक स्त्री सन्मानाने, आत्मविश्वासाने आणि चांगल्या आरोग्यासह तिच्या मासिक पाळीचे व्यवस्थापन करू शकेल. चला हा आठवडा साजरा करूया आणि अशा भविष्यासाठी काम करूया जिथे मासिक पाळीची स्वच्छता ही आता अडथळा नसून महिला सशक्तीकरणाच्या दिशेने एक पाऊल टाकणार आहे.

या संवेदनशील विषयाला समजून घ्यावे मासिक पाळीबाबतचे समाजातील गैरसमज दूर होणे गरजेचे आहे,

**-डॉ. मनीषा जाधव**
होमिओपॅथिक फिजिशियन व
आहार तज्ज्ञ, नांदेड
मो. ९५१८५३९३९९

# शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!



मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे. मागील दोन तीन दिवसांपासून मुंबईत चालू असलेल्या पावसाने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवली. रविवारी तर मुंबईत २९४ मिली पाऊस झाला. तब्बल १०७ वर्षांनंतर मुंबईत मे महिन्यात विक्रमी पाऊस झाला. मुंबईत पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली. पाणी तुंबल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. जागोजागी गुडघाभर पाणी साचले. रस्त्यांवर देखील पाणी साचले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली. महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला.

रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे काही लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावू लागल्या. लोकलही धीम्या गतीने सोडाव्या लागल्या. लोकांच्या घरात पाणी साचल्याने लोकांचा संसार पाण्याखाली गेला. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. मोठ्या पावसाने मुंबईची दैना का झाली याला जबाबदार कोण? यावर राजकारण सुरू झाले; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते? पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत.

२६ जुलैच्या पावसानंतर शासन, प्रशासन आणि नागरिकांनीही कोणताच धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा. पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनले आहे. मुंबईतील रस्तेही सिमेंटचे आणि पेव्हर ब्लॉकचे बनले आहे त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते. त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक! राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल.

नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. यासोबतच नागरिकांनी वाटेल तिथे कचरा टाकायची सवयही मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिगमुळे दरवर्षी मुंबईच्या समुद्र पातळीत वाढ होतेय. मुंबई तुंबण्याचे हे ही एक कारण आहे. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते. मागील वर्षी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. पाच वर्षांपुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पावसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले.

पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची इतिहासातील ती पहिलीच वेळ होती. मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचा देखील अंदाज येत नाही. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो. आता हेच पहा ना यावर्षी मे महिन्यातच पावसाने धुमाकूळ घातला आहे. मे महिन्यातील पावसाने आजवरचे सर्व रेकॉर्ड तोडून टाकले आहेत. मे महिन्यात असा इतका पाऊस यापूर्वी कधीही झाला नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त आज जनजागृती

**नांदेड (प्रतिनिधी)–** मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त मासिक पाळीबाबत जागृती करण्यासाठी २८ मे रोजी जागतिक जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया असून, समाजात अजूनही याबाबत गैरसमज व अज्ञान आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शाळा व गाव पातळीवर किशोरवयीन मुली व महिलांसाठी जनजागृतीपर कार्यक्रम, संवाद सत्रे, आरोग्य शिबिरे, प्रबोधन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. पाळीविषयी मौन तोड' या दृष्टिकोनातून खुला संवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन व योग्य सवयी यांचा प्रसार करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### आदर्श आदिवासी गाव योजनेसाठी सेवाभावी संस्थांना अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी बहुल गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आदर्श आदिवासी गाव योजना राबविण्याबाबत शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. ही योजना राबविण्यासाठी सेवाभावी संस्था यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. दिलेल्या अटी व शर्तीनुसार सेवाभावी संस्थानी प्रस्ताव शुक्रवार ६ जून २०२५ पर्यंत सादर करावेत. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला यांनी केले आहे.

# ‘कोकणस्थ’मधील जीवनानुभव रोमांचकारी

## डॉ. सुरेश सावंत यांचे प्रतिपादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** ‘कोकणस्थ’ ह्या पुस्तकात स्थलदर्शन आणि जीवनदर्शनही आहे. प्रज्ञा सामंत यांची लेखनशैली नर्मविनोदी आणि हृदयस्पर्शी आहे. त्यांचे लेखन पीळदार आणि संमोहक आहे. यातील जीवनानुभव अतिशय रोमांचकारी आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी केले.

प्रज्ञा नीळकंठ सामंत लिखित ‘कोकणस्थ’ या ललितलेखसंग्रहाचे मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरच्या ‘रंगस्वर’ या सभागृहात कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या वेळी विचारपीठावर माजी आमदार अरविंद नेरकर, डॉ. मुकुंद कुळे, डॉ. श्रीराम गव्हाणे, सुहास ठाकूर, राजेंद्र सामंत इ. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

लेखिका प्रज्ञा सामंत यांनी त्यांचे वडील माजी आमदार नीळकंठ सामंत यांच्या निधनानंतर त्यांनी उभारलेला वाहन पुरवठा व्यवसाय नेटाने पुढे चालविला आणि तो एका उंचीवर नेला. कोवळ्या वयात पडलेली जबाबदारी यशस्वीपणे कशी पार पाडली. त्यासंबंधीच्या काही आठवणी या पुस्तकात आहेत. यासोबतच कोकणातील निसर्ग, कोकणातील मंदिरे, देवदेवाचार यांचे रंजक लेखही यात आहेत.

कवयित्री डॉ. वृषाली किन्हाळकर यांनी आपल्या भाषणात पुस्तकातील सौंदर्यस्थळे अधोरेखित केली. त्या पुढे म्हणाल्या, की प्रज्ञा सामंत यांनी बाईपणाच्या नव्हे, तर माणूसपणाच्या भूमिकेतून लेखन केले आहे. ह्या लेखनात कुठेही कटुता नाही तर निखळ प्रांजळपणा आहे. ह्या लेखनातून प्रज्ञाताईंची उंची आणि मानवतावादी दृष्टिकोन नजरेत भरतो.

डॉ. सुरेश सावंत म्हणाले की, ‘कोकणस्थ’ ह्या पुस्तकात लेखिकेचे सश्रद्ध, निसर्गप्रेमी, सुसंस्कृत, सौंदर्यासक्त मन आणि समृद्ध व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित झाले आहे. यात कोकणाचे लोभस व्यक्तिमत्त्व उत्कटतेने उतरले आहे. लेखिकेने ह्या पुस्तकात कोकणी लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे यथातथ्य दर्शन घडविले आहे. यातील व्यक्तिचित्रे अतिशय ठसठशीत आणि उठावदार आहेत. प्रज्ञा सामंत यांच्या लेखनात भाषेचे सौंदर्य आहे, विचारांची स्पष्टता आहे आणि भावनांची उत्कटता आहे. लेखनात कोकणची हिरवाई आहे, सागराचा खळाळ आहे, नारळी-पोफळीची उंची आहे आणि शहाळ्याची गोडी आहे. माणसाचे यंत्र बनत चाललेल्या ह्या कालखंडात लेखिकेची संवेदनशीलता फार महत्त्वाची वाटते. लोकसंस्कृतीचे अभ्यासक डॉ. मुकुंद कुळे आणि डॉ. श्रीराम गव्हाणे यांनी आपल्या भाषणात ‘कोकणस्थ’ विषयी लोकसंस्कृतीच्या अंगाने मांडणी केली. माजी आमदार अरविंद नेरकर, सुहास ठाकूर, राजेंद्र सामंत, प्राची सामंत यांचीही समयोचित भाषणे झाली. मोहम्मद मकसूद इनामदार, युक्ती मीडियाच्या अर्चना सोंडे, प्राची सामंत, दत्तराम गायकर यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन शिवाजी आंबुलगेकर यांनी केले. नीलिमा ठाकूर यांनी आभार मानले.

# सिडको परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यावर कचराच कचरा, स्वच्छता विभागाचे दुर्लक्ष



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत गेल्या आठ दिवसांपासून परिसरात होत असलेल्या संततधार पावसामुळे नाल्यातील घाण व पाण्यासोबत वाहून आलेला कचरा रस्त्यावरच पसरला आहे. या नागरिकांना व वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. स्वच्छता विभागाने या कडे दुर्लक्ष केले असून तात्काळ साफ सफाईची कामे करावीत, अशी मागणी होत आहे.

सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत कार्यालय जवळ मुख्य मार्गावर व अंतर्गत रस्त्यावर संततधार पावसामुळे नाल्यातील घाण वाहुन आलेला कचरा रस्त्यावर पसरला आहे. वाहन धारकांसह परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, विशेष म्हणजे मनपाच्या क्षेत्रीय कार्यालय जवळच हा कचरा मोठ्या प्रमाणात विखुरलेल्या अवस्थेत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून संततधार पावसामुळे नाल्यातील व वाहुन आलेल्या कचरा विखुरलेला अवस्थेत इतरत्र ही मोठ्या प्रमाणात आहेत. स्वच्छता निरीक्षक, खाजगी कंपनीचे व्यवस्थापक यांच्या सह अनेक कर्मचारी कार्यरत असूनही त्यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. रोगराई पसरण्याच्या अगोदर सिडको हडको परिसरासह विविध भागातील कचरा तात्काळ उचलण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# विकसित कृषी संकल्प अभियान शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी



**नांदेड (प्रतिनिधी)–** कृषि मंत्रालय भारत सरकार व भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत विकसित कृषी संकल्प अभियान २९ मे ते १२ जून २०२५ दरम्यान देशभरात राबवले जात आहे. या अभियानाचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, सुधारित पिके, पशुपालन, मत्स्यपालन तसेच विविध सरकारी योजना आणि धोरणांची माहिती देणे हा आहे.

नांदेड जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्र सगरोळी हे या अभियानाचा भाग म्हणून बिलोली, देगलूर, नायगाव, उमरी, धर्माबाद, मुखेड, लोहा व कंधार तालुक्यातील ९० गावांमध्ये विशेष उपक्रम राबविणार आहे. या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना सुधारित कृषी तंत्रज्ञान, बाजारपेठ नियोजन, शासकीय योजनांचे फायदे, नव्या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर याविषयी मार्गदर्शन मिळणार आहे.

या अभियानात तज्ज्ञांशी थेट संवाद आणि मार्गदर्शन, सुधारित तंत्रज्ञान आणि नव्या जातींबाबत सविस्तर माहिती, सरकारी योजनांची अंमलबजावणी आणि लाभांविषयी संपूर्ण माहिती, प्रगतशील शेतकऱ्यांच्या नवकल्पना व नव्या प्रयोगांचे दस्तऐवजीकरण अभियानाचा नियंत्रण आणि समन्वय आदी लाभ मिळणार आहे.

अभियान प्रभावीपणे पार पाडण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र सगरोळी विशेष समिती स्थापन करणार असून राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय अधिकारी, संशोधक आणि प्रगतशील शेतकरी यात सहभागी होतील. व्हॉटसप Whatspp गट आणि दैनिक अहवाल संप्रेषणाच्या माध्यमातून नियंत्रण कक्ष कार्यरत राहील.

या अभियानाद्वारे नांदेड जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा विकास निश्चितच होणार आहे. शेतकऱ्यांनी या अभियानात जास्तीतजास्त सहभाग घेऊन नवे ज्ञान मिळवावे आणि आपल्या उत्पादनक्षमतेत वाढ करावी, असे आवाहन कृषि विज्ञान केंद्र सगरोळी तर्फे करण्यात आले आहे.

# महानगरपालिकेत शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीची आढावा बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेत मंगळवारी (दि.२७) मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीची आढावा बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये शहरात सुरु असलेल्या विविध विकास कामांच्या सद्यस्थितीबाबत आढावा घेण्यात आला. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण व महानगरपालिका यांनी एकमेकांशी समन्वय साधुन शहरातील अर्धवट असलेली कामे तात्काळ पुर्ण करावित असे निर्दे श यावेळी मनपा आयुक्तांनी दिले आहेत,

मान्सुनमध्ये शहरातील सखल भागात पावसाचे पाणी न साचता त्याचा तात्काळ निचरा होण्यास सहकार्य होऊन नागरीकांची गैरसोय होणार नाही. तसेच शहरातील नाले सफाईच्या कामातील अडथळे काढून नाले प्रवाहित करण्याकरिता संबंधितांना आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच उर्वरीत नाले सफाईचे काम तात्काळ पूर्ण करण्याचे निर्दे शही देण्यात आले. शहरातील होर्डिंग बाबत क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्वे करून अनाधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले.

या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता ओ. गी. काळे, एम. बी. नरमीटवार, एम. बी. प्रमोद वा. क्षिरसागर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग नांदेड, विजय घनबहादुर कार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग नांदेड, नवनाथ सोनटक्के सहाय्यक अभियंता साबांवि नांदेड, शिवम सुनिल वाकोडकर सहाय्यक अभियंता नांदेड पाठबंधारे विभाग नांदेड (उत्तर) आदी शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीचे निमंत्रीत सदस्य उपस्थित होते.

या व्यतिरीक्त शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीचे महानगरपालिकेचे सदस्य प.ला. आलुरकर सहाय्यक संचालक नगररचना, जनार्धन पक्कान्ने लेखा व वित्त अधिकारी, सुप्रिया टवलारे उपआयुक्त (प्रशासन), अजितपालसिंघ संधु उपआयुक्त तथा नगरसचिव, नितीन दशरथ गाढवे उपआयुक्त (आपत्ती), सुमंत पाटील शहर अभियंता, श्री गुलाम सादेख सहाय्यक आयुक्त (स्वच्छता विभाग), सतीश ढवळे उप अभियंता (विद्युत), विश्वनाथ स्वामी कार्यकारी अभियंता साबांवि, दिलीप टाकळीकर उप अभियंता साबांवि, प्रकाश कांबळे उप अभियंता (पा.पु. व यांत्रिकी), डॉ. मिर्झा फरहतउल्ला बेग (आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, क्षे. का. क्रं.६ श्रीमती निलावती डावरे क्षेत्रिय अधिकारी क्षे. का. क्र.१, रावण सोनसळे क्षेत्रिय अधिकारी क्षे. का. क्र. ५,वसीम तडवी (स्वच्छता विभाग), तसेच किरण सुर्यवंशी क. अभियंता साबांवि मनपा, सा. बां. विभागाचे कनिष्ठ अभियंता संदीप पाटील उपस्थित होते

# १ कोटी ६ लाखांचा मुद्देमाल लंपास केल्या प्रकरणी सहा जणांवर गुन्हे दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** पिंपळगाव महादेव परिसरातील एका ट्रान्सपोर्ट कंपनीचे तीन ट्रक, कोळसा, धान्य आदी १ कोटी ६ लाखांचा मुद्देमाल जबरीने लंपास करण्यात आला आहे. याप्रकरणी तक्रारदाराने पोलीस अधीक्षक नांदेड यांच्याकडे धाव घेतल्यानंतर अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पाटील ट्रान्सपोर्ट कंपनी येथे कपिल पोकर्णा व इतर अनोळखी सहा लोक (सर्व रा.नांदेड) दि.१७ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास हरिओम डिगोळे व शुभम केंद्रे यांच्या ट्रक मधील रोख रक्कम १ लाख ६२ हजार ५०० रुपये, दुसऱ्या ट्रकमधील कोळसा रू. १ लाख ३९ हजार २६७, तिसऱ्या ट्रक मधील गहु, चनादाळ, हाळद अंदाजे २ लाख रुपये व तिन्ही ट्रकची किंमत १ कोटी रुपये असा एकुण १ कोटी ६ लाख ५७ हजार ३६६ रूपयांचा माल चाकूचा धाक दाखवुन, जबरीने दुकानातील कंम्प्युटर, सीसीटीव्हीचे साहित्य, दोन टेबल व महत्वाचे कागदपत्र तसेच शेजारचे शटर तोडून दुकानातील गहु, दाळ, हळद व इतर महत्वाचे कागदपत्रे जबरीने वाहनातून (छोटा हत्ती) घेवुन गेले. तसेच हरिओम डिगोळे यांना शिवीगाळ करण्यात आली. हरिओम डिगोळे यांच्या तक्रारीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धोंडीबा मस्के यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पारडी येथील ज्येष्ठ नागरिक धोंडीबा तुकाराम मस्के (वय ७१) यांचेमंगळवारी पहाटे दि. २७ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात, पत्नी, तीन मुले, मुलगी, सुना, नातू असा परिवार आहे. परिवहन महामंडळातील कर्मचारी चंद्रकांत मस्के यांचे ते वडील होत.



# माकपच्या केंद्रीय अधिवेशनाची विभागीय रिपोर्टींग सभा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मदुराई येथे झालेल्या पक्ष काँग्रेसच्या रिपोर्टींगचा विभागीय कार्यक्रम शहरातील ताज पाटील हॉटेल मध्ये २७ मे रोजी घेण्यात आला. पक्षाचे नवनिर्वाचित राज्य सचिव व केंद्रीय कमिटी सदस्य कॉ. डॉ.अजित नवले यांनी रिपोर्टींगचे विश्लेषण सोप्या भाषेत प्रतिनिधी समोर मांडले.

रिपोर्टींग सभेच्या अध्यक्षस्थानी माकप राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ. विजय गाभने हे होते. प्रास्ताविक नांदेड जिल्हा सचिव कॉ. शंकर सिडाम यांनी केले. यावेळी मंचावर कॉ. उद्धव पौळ, कॉ. भगवान भोजणे, कॉ अजय बुरांडे, कॉ. बब्रुवान पोटभरे, कॉ. मारोती खंदारे, कॉ रोहिदास जाधव आदींची उपस्थिती होती. मराठवाडा विभागातून एकूण ११८ प्रतिनिधी उपरोक्त विचार मंथन कार्यक्रमाला उपस्थित होते.

माकप केंद्रीय कमिटीने निश्चित केलेली आगामी त्रेवार्षिक लढ्याची रणनीती, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि पक्ष काँग्रेसने केलेल्या मार्गदर्शक तत्वांवर चर्चा करण्यात आली.

राज्य सचिवांनी केलेल्या मांडणीवर काही निवडक प्रतिनिधीनी प्रश्न विचारून चर्चे त भाग घेतला. त्या प्रश्नांना कॉ. अजित नवले यांनी उत्तरे दिली. विभागीय रिपोर्टींग सभेच्या कार्यक्रमाचा समारोप सभेचे अध्यक्ष कॉ. विजय गाभणे यांनी केला तर आभार कॉ. उज्वला पडलवार यांनी मानले.

# बिलोली तालुक्यातील गंजगावात तरुणाचा मृतदेह आढळला; घातपाताची शक्यता

**बिलोली (प्रतिनिधी)–** तालुक्यातील सीमावर्ती भागातील शेवटच्या टोकाला असलेल्या गंजगाव येथे अगदी गावाच्या बाजुलाच दि.२७ मे रोजी एका ३५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळला. सदर तरूणाचा घातपात झाल्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने पोलिसांनी घटनास्थळ गाठून प्राथमिक अवस्थेत पुढील तपास करीत असतांना दोन संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचे समजते.

दि.२७ मे रोजी सकाळी तालुक्यातील तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या गंजगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या मागील बाजूस गावातीलच मारोती गंगाराम वन्नरवार (वय ३५) यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेहाची पाहणी करून पंचनामा केला. सदर तरूणाचा घातपात झाल्याची शक्यता मृतकाच्या नातेवाईकांनी व्यक्त केल्यानंतर पोलिसांनी त्या दिशेने तपास सुरू केला आहे. तपासात दोन संशयीत व्यक्तींना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले. वृत्त लिहीपर्यंत बिलोली पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरूच होती.

# सिटी स्ट्रिट सेफ्टी पथकाची सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन शांतता भंग करणारे व साहित्य विक्री करणाऱ्यांवर धडक कारवाई





**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथक प्रमुख सपोनि भागवत नागरगोजे व चार्ली पोलीस अंमलदार यांनी २५ मे रोजी नांदेड शहरात सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करणारे, दारूचे साहित्य विकणारे व दारू पिऊन शांतता भंग करणाऱ्या ७ इसमांवर कारवाई केली आहे.

पोलीस स्टेशन वजिराबाद सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रं. एक मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान रेल्वेस्टेशन परिसरात एक इसम आणि मुख्यबसस्थानकात दोन इसम मद्य प्राशन करतांना आढळून आले. त्यांच्यावर कलम ११०/११७ म. पो. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन विमानतळ सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रं. एक मधील पोलीस अंमलदार यांना पेट्रोलिंग दरम्यान दोन इसम रस्त्यावर स्प्लेंडर वाहनावर कर्कश आवाज करीत असताना मिळून आले. त्यांना ताब्यात घेवून त्यांच्यावर कलम १९८ मोटार वाहन कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह पथकातील चार्ली क्रं. एक मधील पोलीस अंमलदार पेट्रोलिंग करीत असतांना ढवळे कॉर्नर येथे ४ इसम सार्वजनिक ठिकाणी दारू पिण्याचे साहित्य पाणी व ग्लास विकत घेत असतांना मिळून आले. तसेच इंदिरा गांधी परिसरात एक इसम दारू पिऊन गोंधळ घालतांना दिसून आले. तसेच गुरूवार बाजार परिसरात एक इसम दारू प्राशन करीत असतांना मिळून आला. वसरणी येथे मोकळ्या जागेत एक इसम दारू पित असतांना मिळुन आला. असे एकुण ७ इसमांवर पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे कलम ११०/११७ म.पो.का. कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

नांदेड शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये, तसेच दारू पिणाऱ्यासाठी जागा उपलब्ध करून देवू नये, व सार्वजनिक शांततेचा भंग करू नये, अन्यथा संबधीत इसमांवर कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला आहे.

# अर्धापूर बोगस जन्म नोंदी प्रकरणाची चौकशी होऊन कारवाई होणारच -माजी खा. किरीट सोमय्या

## एका नेत्यासह अनेक लाभार्थ्यांवरही कारवाई अटळ

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** येथील ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने बोगस ८२ जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. या प्रकरणी संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोगस जन्म प्रमाणपत्र देणे हा देशाच्या सुरक्षेच्या गंभीर विषय आहे. या बोगस जन्म प्रमाणपत्र प्रकरणी अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन माहिती घेतली. तसेच पोलीस ठाण्यात पोलीस अधीक्षकांशी चर्चा केली. या गुन्ह्याचा तपास करून संबंधितांवर लवकरच कारवाई होईल अशी माहिती माजी खा.किरीट सोमय्या यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे.



माजी खा.किरीट सोमय्या यांनी दि.२७ रोजी येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन प्रमाणपत्र कसे दिले. ग्रामिण रुग्णालय अस्तित्वात नसतांनाच्या तारखेतही जन्म झाल्याचे प्रमाणपत्र दिले गेले. तसेच अनेक वर्षांपासून जन्म ग्रामीण रुग्णालयात झाला असल्याचे प्रमाणपत्र कसे दिले. यासंबंधी रुग्णालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली. त्यामुळे जे जबाबदार असतील त्यांच्यावर १०दिवसात कार्यवाही होईल. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी माहिती दिली असून या गुन्ह्याचा तपास पोलीस उपअधीक्षक सुशिल नाईक यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

यावेळी तहसीलदार रेणुकादास देवणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन, पोलीस निरक्षक चंद्रशेखर कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णुपंत कराळे, उपनिरीक्षक सुरेश भोसले यांनी केलेल्या तपासाची माहिती देण्यात आली. भाजप जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, माजी महानगर अध्यक्ष प्रवीण साले, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, उपनगराध्यक्ष मुक्तदर खान पठाण, डॉ. विशाल लंगडे, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सरोदे, माजी जि.प.सदस्य रामराव भालेराव, विलास साबळे, तुकाराम माटे, शिवराज जाधव, संजय डुबे, प्रतिम भुस्से यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय



# केसांच्या वाढीसाठी रामबाण तेल

**केस गळणे किंवा तुटणे ही समस्या सामान्य आहे. बदलती जीवनशैली आणि पौष्टिक आहाराच्या अभावामुळे आपले केस कमकुवत होतात. केसांशी संबंधित समस्यांमुळे सध्या बहुतांश जण त्रस्त आहेत. तणाव, शरीरातील पोषण तत्त्वांची कमतरता, कोंडा, शारीरिक आजार, थायरॉइड इत्यादी कारणांमुळे केसगळतीची समस्या निर्माण होते. प्रत्येक वयोगटातील व्यक्ती केसगळती तसंच टक्कल पडण्याच्या समस्येचा सामना करतात. पण यामागील प्रत्येकाची कारणे वेगवेगळी असू शकतात. काही जण केसांवर कलर ट्रीटमेंट, डाय लावणे किंवा ब्लीचिंग यासारख्या केमिकलयुक्त प्रोडक्टचा भडीमार करतात. यामुळे केसांच्या मुळांवर दुष्परिणाम होतात. परिणामी केस प्रचंड प्रमाणात गळतात. तर मेनोपॉजदरम्यान शरीरातील हार्मोन असंतुलित होत असल्या कारणामुळेही महिलामध्ये केसगळतीची समस्या अधिक प्रमाणात वाढते. तुम्ही देखील केसगळतीच्या समस्येमुळे त्रस्त आहात का ? तर ही समस्या दूर करण्यासाठी घरच्या घरी तयार केलेल्या आयुर्वेदिक तेलाचा वापर करून पाहा. या तेलाच्या उपयोगामुळे तुमचे केस निरोगी आणि चमकदार राहण्यास मदत मिळू शकते. जाणून घेऊया सविस्तर माहिती...**

- केसांसाठी भृंगराज तेल : भृंगराज ही एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. भृंगराज तेलाचा प्राचीन काळापासून केसांसाठी वापर केला जात आहे. हे तेल केसांच्या आरोग्यासाठी वरदान आहे. या तेलाच्या वापरामुळे टाळूच्या भागातील रक्त प्रवाह वाढण्यास मदत मिळते. ज्यामुळे केसांची योग्य पद्धतीने वाढ होते. तुम्ही घरच्या घरी देखील सहजरित्या भृंगराज तेल तयार करू शकता.
- भृंगराज तेलातील औषधी गुणधर्म : भृंगराज तेलातील औषधी गुणधर्मामुळे तुटणाऱ्या केसांची समस्या दूर होण्यास मदत मिळते. भृंगराजमधील नैसर्गिक गुण केसांचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी प्रभावी आहेत. या तेलातील पोषक घटक अधिक वाढवण्यासाठी त्यात एक मोठा चमचा शिकेकाई पावडर मिक्स करा. शिकेकाईतील गुणधर्म टाळूच्या त्वचेवरील अतिरिक्त सीबमचा स्त्राव नियंत्रणात आणण्याचे कार्य करतात. ज्यामुळे केसांची वाढ होण्यास मदत मिळते.
- केसांना कसे लावायचे भृंगराज तेल? : घरात तयार केलेले भृंगराज तेल अर्ध्या मिनिटासाठी गरम करा. यानंतर तेल टाळूवर लावा आणि हलक्या हाताने केसांचा मसाज करा. कमीत कमी २० मिनिटांसाठी केसांचा मसाज करावा. यानंतर तासाभरासाठी तेल केसांमध्ये राहू द्यावे. थोड्या वेळाने हर्बल शॅम्पूने केस स्वच्छ धुवून घ्या. अशा प्रकारे आठवड्यातून दोनदा भृंगराज तेल लावून केसांचा मसाज करावा. यामुळे केस मजबूत आणि निरोगी राहण्यास मदत मिळेल. सोबत केसगळती तसंच केस तुटण्याच्या समस्येतूनही तुमची सुटका होईल. विशेष म्हणजे या तेलामुळे केसांवर कोणतेही दुष्परिणाम होत नाही.

### भृंगराज तेल तयार करण्याची विधी

- साहित्य : नारळाचे तेल एक कप, भृंगराज पावडर एक चमचा, मेथी दाणे एक चमचा.
- कृती : भांड्यामध्ये एक कप नारळाचे तेल गरम करत ठेवा. तेलामध्ये मूठभर बारीक कापलेली भृंगराजची पाने किंवा एक मोठा चमचा भृंगराज पावडर मिक्स करा. यानंतर तेलात एक चमचा मेथी दाणे टाका आणि मिश्रण जवळपास पाच मिनिटांसाठी गरम करा. तेल गरम झाल्यानंतर गॅस बंद करा आणि मिश्रण थंड होण्यास ठेवून द्या. तेल थंड झाल्यानंतर गाळून घ्या आणि एका बाटलीमध्ये भरा.

# केसांसाठी बदाम ठरेल वरदान!



**एवढ्याशा बदामाचे आरोग्यवर्धक फायदे प्रचंड आहेत. यासाठी आपले आई-बाबा आणि आजी-आजोबा आपल्याला बदामातील पोषक गुणधर्मांबाबतची माहिती वारंवार सांगत असतात आणि नियमित बदाम खाण्याचाही सल्ला देतात. जी लोक दूध किंवा दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करत नाहीत किंवा काही कारणास्तव करू शकत नाही, अशा लोकांसाठी बदाम म्हणजे वरदान. बदामाचे कित्येक आरोग्यवर्धक तसंच सौंदर्यवर्धक लाभ आहेत. बदामाचे दूध केवळ आरोग्यासाठीच नव्हे तर आपल्या केसांसाठीही पोषक आहे. यामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड आणि ओमेगा ६ फॅटी ॲसिडचा समावेश आहे, ज्यामुळे आपले केस लांबसडक, घनदाट व मजबूत होण्यास मदत मिळते. बदामाच्या दुधापासून तयार करण्यात येणाऱ्या घरगुती हेअर पॅकची माहिती आपण जाणून घेऊया. या हेअर पॅकचा योग्य पद्धतीने उपयोग केल्यास केसांचे आरोग्य निरोगी राहते.**

### साहित्य

बदामाचे दूध अर्धा कप, बदामाचे तेल एक मोठा चमचा, एरंडेल तेल एक मोठा चमचा, कोमट पाणी अर्धा कप.

### कृती

एका बाउलमध्ये बदामाचे दूध, बदामाचे तेल आणि एरंडेल तेल एकत्र घ्या. सर्व सामग्री नीट एकजीव केल्यानंतर त्यामध्ये कोमट पाणी मिक्स करा. पेस्ट थोडीशी पातळच तयार करावी.

- हेअर पॅक कसे लावावे ? : हेअर पॅक लावण्यापूर्वी कंगवा करून घ्यावा. यानंतर १० ते १५ मिनिटांसाठी केसांवर पेस्ट लावा आणि हलक्या हाताने केसांचा मसाज करावा. आता केसांवर शॉवर कॅप लावून ठेवा. एक किंवा दोन तासांनंतर आपले केस थंड पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावेत.
- बदाम मिल्क कंडिशनिंग हेअर पॅकचे फायदे : या नैसर्गिक उपचारामुळे पांढऱ्या केसांची समस्या नियंत्रणात येण्यास मदत मिळते. पांढऱ्या केसांपासून सुटका मिळवण्यासाठी केमिकलयुक्त ट्रीटमेंट करण्याऐवजी नैसर्गिक उपचारांची मदत घ्यावी. वारंवार हेअर डायचा वापर केल्याने केसांचे प्रचंड नुकसान होऊ शकते. हे नुकसान टाळण्यासाठी केसांसाठी बदामाच्या दुधाचा वापर करू शकता. यामध्ये व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन सी आणि लोह अशा कित्येक पोषक घटकांचा समावेश आहे. ज्यामुळे पांढऱ्या केसांची समस्या दूर होऊ शकते.
- जाड आणि घनदाट केसांसाठी : निर्जीव आणि कोरड्या केसांमुळेही काही जणांच्या आत्मविश्वासावर परिणाम होऊ शकतो. या समस्येवर वेळीच उपाय करावेत. बदामाच्या दुधामध्ये पौष्टिक तत्त्वांचा भरपूर प्रमाणात समावेश आहे. उदाहरणार्थ व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन ई, झिंक, पोटॅशिअम इत्यादी. ज्यामुळे केसांचे आरोग्य सुधारण्यास मदत मिळते. बदामातील पोषण तत्त्वांमुळ केस सुंदर, चमकदार आणि मजबूत होतात.
- टाळूच्या त्वचेशी संबंधित संसर्ग : योग्य काळजी न घेतल्यास केसांशी संबंधित समस्या निर्माण होणे स्वाभाविक आहे. टाळूच्या त्वचेशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी तुम्ही बदामाच्या हेअर पॅकचा उपयोग करू शकता. यातील औषधी गुणधर्म टाळूची त्वचा निरोगी ठेवण्याचे कार्य करतात. या हेअर पॅकचा नियमित योग्य वापर केल्यास टाळूला येणारी खाज आणि अन्य समस्या दूर होतील. टाळूची त्वचा निरोगी ठेवण्यासाठी हेअर पॅकमध्ये एरंडेल तेलाऐवजी एक मोठा चमचा दही आणि नारळ तेल मिक्स करावे.
- केसांच्या वाढीसाठी पोषक : लांबसडक आणि घनदाट केस असावेत, अशी प्रत्येकाची इच्छा असते. पण प्रदूषण आणि केमिकलयुक्त प्रोडक्टमुळे आपल्या केसांवर प्रचंड प्रमाणात दुष्परिणाम होतात. बदामाच्या दुधामध्ये मॅग्नेशिअमचे प्रमाण भरपूर असते, ज्यामुळे मुळांसह केस मजबूत होण्यास मदत मिळते. सोबत यातील लोहाच्या गुणधर्मामुळे रक्तप्रवाहही वाढतो, या प्रक्रियेमुळे केस निरोगी राहतात.
- केसांना खोलवर पोषण तत्त्वांचा होतो पुरवठा : बदामामुळे केस मऊ आणि चमकदार होतात. या हेअर पॅकमुळे केसांना खोलवर पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. यामुळे कोरड्या, निर्जीव आणि दुभंगलेल्या केसांचीही समस्या दूर होते.

# कोरफडीसह 'हे' पदार्थ मिसळून बनवा घरगुती तेल

**आपले केस लांब, घनदाट आणि चमकदार असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते. परंतु, अयोग्य आहारामुळे म्हणा, केसांची व्यवस्थित काळजी न घेतल्यामुळे किंवा सध्याच्या वाढत्या प्रदूषणाच्या त्रासाने केस गळण्याच्या समस्येचा सामना बहुतेकांना करावा लागत आहे. यासाठी बाजारामध्ये विविध प्रकारची तेलं, हेअर मास्कसारखी उत्पादने उपलब्ध असतात. परंतु, अशी उत्पादने सगळयांना परवडण्यासारखी असतीलच असे नाही. अशावेळी जर घरात असणाऱ्या गोष्टींपासून तयार होणारे आणि कोणतेही रासायनिक घटक नसणारे तेल बनवता आले तर केसांच्या आरोग्यासाठी फारच फायदेशीर ठरू शकते. नाही का ?**

### कोरफडीचे तेल कसे वापरावे ?

आठवड्यातून तीन दिवस हे तेल आपल्या केसांच्या मुळांना लावून छान मसाज करावा. तेलाचा सांगितल्याप्रमाणे नियमित वापर केल्यास, तीन महिन्यांमध्ये तुम्हाला फरक जाणवेल. आठवड्यातून तीन दिवस हे तेल केसांना लावल्यास केसांची गळती कमी होईल, केस तुटण्यासारखी समस्या कमी होऊन नवीन केस उगवण्यास मदत होऊ शकते.



### केसांसाठी कोरफडीचे घरगुती तेल कसे बनवावे पाहा

- साहित्य : कांदा, कढीपत्ता, कोरफड, काळी मिरी, मेथीचे दाणे, खोबरेल तेल.
- कृती : सर्वप्रथम कोरफडीची पाने व्यवस्थित धुवून पानाच्या बाजूला असणारे काटे काढून, कोरफडीचे छोटे छोटे तुकडे करून बाऊलमध्ये ठेवावे. त्यानंतर त्याच बाऊलमध्ये कांद्याचे तुकडे आणि कढीपत्त्याची पाने घालावी. हे सर्व पदार्थ मिक्सरमधून वाटून घ्यावे. आता गॅसवर एक कढई ठेऊन त्यामध्ये खोबरेल तेल घालून तयार केलेले कोरफड, कांदा आणि कढीपत्त्याचे मिश्रण घालून घ्यावे. हे सर्व मिश्रण सतत ढवळत राहून शिजवून घ्यावे. आता या मिश्रणाला बुडबुडे येऊ लागले की त्यामध्ये काळी मिरी आणि मेथीचे दाणे घालावे. काही मिनिटांसाठी मंद गॅसवर हे तेल ढवळत राहून नंतर कढईखालील गॅस बंद करावा. आता काचेच्या बरणीवर एक कापड ठेवून, त्यामधून हे तेल गाळून घेऊन बरणीत भरून घ्यावे. केसांना घनदाट बनवणारे कोरफडीचे तेल तयार आहे.

# मोहरीचे तेल खूप फायदेशीर

**आजकाल खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीच्या जीवनशैलीमुळे केस गळण्याची समस्या सामान्य झाली आहे. आजच्या काळात केसगळतीच्या समस्येने फक्त मुलीच नाही तर मुलेही त्रस्त आहेत. केसगळती कमी करण्यासाठी लोक महागडी उत्पादने वापरतात. पण तरीही विशेष फायदा मिळत नाही. त्याचवेळी, बाजारात उपलब्ध असलेल्या बहुतेक उत्पादनांमध्ये हानिकारक रसायने असतात, ज्यामुळे तुमच्या केसांना आणखी नुकसान होऊ शकते. अशा परिस्थितीत केसगळती रोखण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपायांची मदत घेऊ शकता. या घरगुती वस्तूंमध्ये मोहरीच्या तेलाचाही समावेश आहे. पण मोहरीचे तेल केसांची मुळे मजबूत करते आणि त्यांना तुटण्यापासून देखील मदत करते. यामुळे केसांची वाढही चांगली होऊ शकते. चला तर मग जाणून घेऊया केस गळणे थांबवण्यासाठी मोहरीचे तेल कसे वापरावे.**



- केसांना काळे करण्यासोबतच कढीपत्ता : व्हिटॅमिन-बी आणि अँटीऑक्सिडंटने चमकदार बनवते. कढीपत्ता केसांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. मोहरीच्या तेलात कढीपत्ता टाकून हलके गरम करा आणि थंड झाल्यावर हे तेल केसांच्या मुळांना लावा. यामुळे केस गळणे कमी होते आणि वाढही झपाट्याने होते. कढीपत्त्यात मुबलक प्रमाणात असलेले बीटा-केराटिन केस दाट बनवते. ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर असल्याने केस मजबूत, चमकदार, काळे होण्यास मदत होते. समृद्ध अमीनो ॲसिड केसांची रचना मजबूत करतात.
- कोरफडीमुळे केसांच्या मुळांना पोषण : केस गळणे कमी करण्यासाठी कोरफड खूप फायदेशीर असते. २-३ चमचे ताजे कोरफडीचे जेल मोहरीच्या तेलात मिसळा, ते हलके गरम करा आणि नंतर हे मिश्रण डोक्याला लावा. हलक्या हातांनी मसाज करा, जेणेकरून तेल डोक्यात व्यवस्थित शोषले जाईल. कोरफडीमुळे केसांच्या मुळांना पोषण मिळेल आणि त्यांची लांबीही झपाट्याने वाढेल.
- मोहरीच्या तेलाचे महत्त्व : मोहरीचे तेल केसांसाठी एक उत्कृष्ट औषध आहे. त्यात व्हिटॅमिन ए, ई आणि के आढळतात, जे केसांची वाढ वाढवण्यास मदत करतात. याव्यतिरिक्त, त्यात लोह, मॅग्नेशियम आणि फॅटी ॲसिड देखील असतात, जे टाळूचे पोषण आणि मुळांपासून केस मजबूत करण्यास मदत करतात. मोहरीचे तेल आणि मेथीचे मिश्रण केसांची वाढ सुधारते आणि केस गळतीपासून आराम देते. पांढरे केस काळे होण्यास मदत होते. १-२ चमचे मेथी दाणे रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. सकाळी मेथीचे दाणे बारीक करून त्यात १-२ चमचे मोहरीचे तेल टाकावे. ही पेस्ट तेलात मिसळून डोक्याला लावा. ३०-४० मिनिटे ठेवा आणि नंतर शॅम्पूने केस धुवा. आठवड्यातून दोनदा याचा वापर करा, केसांची लांबी वाढण्यास मदत होईल.

- साहित्य : १ कप मोहरीचे तेल, १ चिरलेला कांदा, १०-१२ लवंगा.
- कृती : सर्व प्रथम कढईत मोहरीचे तेल गरम करा. लवंगा आणि कांदा घालून चांगले उकळा. तेलाचा रंग गडद होईपर्यंत उकळवा. नंतर थंड होऊ द्या. यानंतर तुम्ही हे तेल एका बाटलीत साठवून ठेवू शकता.

### केसांना तेल कसे लावायचे ?

- सर्व प्रथम, आपले केस दोन भागांमध्ये विभाजित करा आणि पूर्णपणे कंगवा करा. यानंतर, हे तेल आपल्या टाळूवर लावा आणि काही वेळ हलक्या हाताने मसाज करा. हे केसांवर किमान १ तास किंवा रात्रभर राहू द्या. त्यानंतर सौम्य शॅम्पूच्या मदतीने केस धुवा. आठवड्यातून दोन ते तीन वेळा याचा वापर केल्याने केसगळती कमी होऊ शकते. तसेच केस लवकर लांब आणि घट्ट होऊ शकतात. केस गळतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोहरीच्या तेलात कांदा आणि लवंग मिसळा.
- केसगळती टाळण्यासाठी कांदा आणि लवंग मोहरीच्या तेलात मिसळून लावू शकता. वास्तविक, कांद्यामध्ये सल्फर आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. ज्यामुळे केस मजबूत होतात आणि गळण्यापासूनही बचाव होतो. त्याच वेळी, लवंगमध्ये जीवनसत्त्वे, लोह, कॅल्शियम, बीटा कॅरोटीन आणि अँटीऑक्सिडंट असतात, ज्यामुळे केस गळणे, केस अकाली पांढरे होणे आणि कोंडा यासारख्या समस्यांपासून आराम मिळतो. या मिश्रणाचा वापर केल्याने केसगळती बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकते.

# लाल फुलामुळे टक्कलावर केस

**केस गळणे, केस पातळ होणे आणि केस अकाली पांढरे होणे या आजकाल बहुतेक लोकांच्या समस्या आहेत. महिला असो की तरुण, प्रत्येकालाच केसांशी संबंधित समस्या असतात. केसांच्या या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास ते केसांचा पोत, सौंदर्य आणि व्यक्तीचा एकूण लुक खराब करू शकतात. म्हणूनच जेव्हा केसांशी संबंधित समस्या सुरू होतात तेव्हा लोक चिंताग्रस्त आणि दुःखी होतात. या सर्व केसांच्या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही केसांच्या समस्यांवर आयुर्वेदिक उपाय शोधत असाल, तर तुम्ही जास्वंदीची फुले आणि नारळ तेल वापरू शकता. केसांची काळजी घेण्यासाठी जास्वंदीची फुले वापरण्याच्या पद्धती आणि त्याचे फायदे जाणून घेऊयात.**



### केसांच्या वाढीसाठी जास्वंदाचे तेल का फायदेशीर आहे ?

जास्वंदाच्या फुलांमध्ये आणि पानांमध्ये अनेक फ्लेव्होनॉइड्स, अँटी-ऑक्सिडंट्स आणि पोषक घटक असतात. या सर्व घटकांचा तुमच्या केसांना अनेक प्रकारे फायदा होतो. उदाहरणार्थ, जर केसांची वाढ थांबली असेल, तर हिबिस्कस वापरल्याने केसांची लांबी वेगाने वाढते. याशिवाय ज्या लोकांचे केस झपाट्याने गळत आहेत त्यांचे केस गळणे थांबवण्यासाठी आणि नवीन केसांची वाढ होण्यास हिबिस्कस उपयुक्त ठरू शकते. जास्वंदाच्या फुलांमध्ये आढळणारे आवश्यक तेल आणि व्हिटॅमिन सी देखील केसांचे पोषण करतात.

### तेल कसे तयार करावे ?

- मंद आचेवर शिजवण्यासाठी एका भांड्यात १०० मिली खोबरेल तेल ठेवा.
- खोबरेल तेलात ८-१० जास्वंदाची फुले आणि काही पाने घाला.
- १५ मिनिटे सर्वकाही शिजवा. नंतर, आचेवरून काढा आणि थंड होऊ द्या.
- आता ते गाळून काचेच्या बाटलीत ठेवा.
- जेव्हा तुम्हाला शॅम्पू करायचा असेल तेव्हा त्यापूर्वी २ तास आधी या आयुर्वेदिक तेलाने केस आणि टाळूची मालिश करा.

**जास्वंदीच्या पानांपासून केसांचे तेल देखील बनवता येते. केसांचे तेल बनवण्यासाठी हिबिस्कसची फुले आणि पाने मिसळा, त्यांना बारीक करून बारीक पेस्ट बनवा. ही पेस्ट १ कप खोबरेल तेलात मिसळा. थोडा वेळ गरम करा. तेल थंड झाल्यावर डोक्याला मसाज करा आणि ३० मिनिटांनी केस धुवा.**

# ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांचे योगदान महत्त्वपूर्ण -राज्यपाल



**मुंबई (प्रतिनिधी)** – जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या संस्थांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. राज्यात प्रधानमंत्री आवास योजना व इतर गृहनिर्माण योजनेंतर्गत लाखो नव्या घरांच्या बांधकामास मान्यता मिळालेली आहे. ही गोष्ट अत्यंत समाधानकारक असून मनरेगा, जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत अभियान यासह विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान २०२३-२४ पुरस्कार वितरण ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ग्रामीण विकासासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन करत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले की, जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता, ग्रामीण गृहनिर्माण, कुपोषण निर्मूलन, सामाजिक न्याय व कल्याण, महिला व बालकल्याण, तसेच पायाभूत सुविधा निर्माण या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचे तसेच लोकप्रतिनिधी, शासकीय कर्मचारी व अधिकारी यांच्या समर्पित सेवेचा या निमित्ताने गौरव करण्यात येत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण देणारे महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. महाराष्ट्र हे त्या मोजक्या राज्यांपैकी एक आहे, जिथे 'सेवा हक्क कायदा' लागू आहे, ज्याद्वारे नागरिकांना विविध सेवा त्यांच्या दारात मिळतात. महिलांच्या सबलीकरणासाठी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) हे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत यशस्वीरित्या राबवले जात आहे. आज राज्यभर हजारो स्वयंसहायता गट स्थापन झाले असून, अनेक महिला गट त्याचा लाभ घेत आहेत. माविम व उमेद यांनी एकत्रितपणे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'लखपती दीदी' या संकल्पनेला मूर्त रूप देण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींनी राष्ट्रीय स्तरावर सातत्याने पंचायतराज पुरस्कार प्राप्त केले आहेत, याचा विशेष आनंद असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले की, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्रिस्तरीय पंचायत राज प्रणालीची संकल्पना मांडत सत्तेचे विकेंद्रीकरण सुनिश्चित केले. ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला, ज्यामुळे स्थानिक प्रतिनिधींमध्ये नेतृत्वगुण विकसित होऊ लागले. अनेक स्थानिक प्रतिनिधी पुढे जाऊन आमदार, खासदार आणि मंत्रीही झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, शासनाने ई-ग्राम स्वराज, डिजिटल ग्रामपंचायत व स्वामित्व योजना यांसारखे अनेक उपक्रम राबवले आहेत. प्रशासनिक प्रक्रियांना गती देण्यासाठी संगणकीकरण, डिजिटल प्रणाली, तसेच विविध ऑनलाइन पोर्टल्स व ॲप्सचा वापर करण्यात येत आहे. तसेच विकसित भारतासाठी आपले योगदान अत्यावश्यक आहे. पंचायत राज संस्थांनी ग्रामसभा माध्यमातून सहभागी आणि समावेशी नियोजन राबवण्याचे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

# उपजिल्हाधिकाऱ्याला पाच लाख घेताना रंगेहात अटक

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यात सरकारी अधिकाऱ्यांकडून लाच घेण्याचं प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. कारण एसीबीच्या धाडीत ग्रामसेवकापासून ते तहसीलदारांपर्यंत कारवाई केल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत. विशेष म्हणजे परभणी जिल्ह्यात महिला क्रीडा अधिकाऱ्यासही लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली होती. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. आता छत्रपती संभाजीनगरमध्ये चक्क निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांस अटक करण्यात आली आहे. तब्बल ५ लाख रुपयांची लाच घेताना एसीबीने आरडीसी महोदयांना रंगेहात अटक केली आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयातील आरडीसी म्हणजेच निवासी उपजिल्हाधिकाऱ्याला ५ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकुनामार्फत ही लाच घेण्यात येत असताना अटक करण्यात आली असून विनोद खिरोळकर असं आरडीसींचे नाव आहे. वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासाठीपूर्वी या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी मोठ्या लाचेची मागणी केली होती. त्यानुसार, संबधित तक्रारदाराकडून २३ लाख रुपये घेतले होते. मात्र, तरीही १८ लाख पुन्हा मागण्यात आले होते. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकून त्रिभुवन यांच्यामार्फत ही लाच घेतली जात होती.






## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहिर प्रगटन द्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, संस्थेचा सभासद श्रीमती सरजितकौर रनबीरसिंग खोकर यांचा प्लॉट सर्वे नं. ८०, प्लॉट ३१, ज्याची चतुसीमा पूर्वेस रोड, पश्चिमेस प्लॉट नं. २७, दक्षिणेस प्लॉट नं. ३०, उत्तरेस प्लॉट नं. ३२, असून याचे क्षेत्रफळ ६०४०=२४०० असून हा प्लॉट श्रीमती गुरमितकौर जगमिर सिग घुमान यांच्या नावे हस्तांतर करण्यासाठी संबंधितांनी संस्थेकडे भर्ज केलेला माहे. तरी वरिल प्लॉट बाबद कुणास काही आक्षेप उजा मालकी हक्क देवाण - घेवाण, कर्ज गहाण खत इ. असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत संस्थेकडे लेखी कागदपत्रासह आक्षेप नोंदवावा. मुदत संपल्यानंतर कोणाचेही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही म्हणून नंदीग्राम सहकारी गृह निर्माण संख्या म. नांदेड सादर करीत आहे.

**अध्यक्ष।सचिव**
**नंदीग्राम सहकारी गृहनिर्माण संस्था**
**म. नांदेड १९/०५/२०२५**

## Change In Name

My old name is ZOHRA BEGUM which now I am, changing as (new name) ZOHRA BEGUM SHAIKH AMJAD. Henceforth, my all correspondence will be done as per my new name, please consider the same. ADD -ISLAPURA MALTEKDI RAOD ITWARA NANDED 431606 MO.9823242736

## Change In Name

My old name is RENUKA SURYAKANT DAMKONDWAR which now I am, changing as new name RENUKABAI SUJIT POLAWAR. Henceforth, my all correspondence will be done as per my new name, please consider the same. ADD -RADHAKRISHAN RESIDENCY NEAR BK HALL SHREENAGAR NANDED 431605 MO.8421286700

## Change In Name

My old name is SHRINIVAS KANKAL which now I am, changing as new name SHRINIVAS VISHNU KANKAL. Henceforth, my all correspondence will be done as per my new name, please consider the same. ADD -S/O VISHNU KANKAL H.N.1-20-140 TIRUMALA NIWAS TOWN MARKET NEAR GODAVARI HOSPITAL TOWN MARKET NANDED, NANDED, NANDED MAHARASHTRA 431602

## Change In Name

Currunt Name - TUBA GAUHER MOHAMMED RIYAZ Currunt-D/o/b-07/01/1989 Previous Name- Tuba Gauher Previous-08/06/1987 Adress- Gulzar bagh galli no 3 nanded Mob numbers-98813 87316

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्या. क. स्तर नांदेड यांच्या न्यायालयात समक्ष श्रीमती बी.एम.एन.देशमुख सह. दि. न्यायालय क. स्तर किरकोळ अर्ज क्र. ७२९/२०२५

१. संजय रामराव रुइकर वय - ५५ धंदा- व्यापार २) संतोष रामराव रुइकर वय - ५० धंदा- नौकरी दोघे रा. घर क्र. १७७ राजश्री निवास, साईबाबा मंदीर जवळ, श्रीनाथ नगर, चैतन्य नगर, तरोडा ब.नांदेड ३.सुशिला भ्र. बळीराम कुंभार उर्फ सुशिला पि. रामराव रुइकर वय - ६० धंदा- घरकाम रा. प्लॅट क्र.२,नम्रता रेसिडेंसी, बालाजी सोसायटी, मराठा मंदिर मागे, बावधन, पुणे ४.सूमन भ्र. शिवराज कळशेट्टी उर्फ सुमन पि. रामराव रुइकर वय - ५७ धंदा- घरकाम रा. घर क्र. १९-१-२८०, शिवस्तुती महादेव कॉलोनी, शिवनगर, साउथ बिदर, बिदर, कर्नाटक

विरूध्द

निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत पुष्पाबाई रामराव रुइकर यांचे वारस आहेत. मयत पुष्पाबाई रामराव रुइकर यांचा मृत्यू दिनांक १३/१२/२०२१ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक १३/०६/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल. आज दिनांक ३०/०४/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **स.अधिकक्ष**

**दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड**

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्या. के. स्तर नांदेड यांच्या न्यायालयात समक्ष अ. द. गोरे सह. दि. न्यायालय के. स्तर किरकोळ अर्ज क्र. ६४४/२०२५

अर्जदार-१.संजय पि. रामराव रुईकर वय ५५ धंदा व्यापार २.संतोष रामराव रुईकर वय ५० वर्ष धंदा नोकरी रा. अर्जदार क्र. १ व २ घर क्र. १७७ राजेश्री निवास साईबाब मंदिराजवळ श्रीनाथ नगर, चैतन्य नगर नांदेड ३. सुशीला भ्र. बलराम कुंभार सुशिला पि. रामराव रूईकर वय ६० वर्ष धंदा घरकाम प्लॅट न. २ नम्रता रेसीडन्सी बालाजी सोसायटी जवळ, मराठा मंदिर बावधन पूणे

सुमन भ्र. शिवराज कालशेटी ४. सुमन पि. रामराव रूईकर वय ५७ धंदा घरकाम रा. घर क्र. १९-१-२८०, शिवस्तुती महादेव कॉलनी बिदर जि. बिदर

विरूध्द- निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे . ज्याअथी अर्जदार मयत रामराव पि. संतूकराव रूईकर यांचे वारस आहेत मयत रामराव पि. संतूकराव रूईकर यांचा मृत्यू, ५/०१/२०२० रोजी झाला.

उपरोक्त अर्जदार यांना मयत रामराव पि. संतूकराव रूईकर यांचे वारस असल्याबाबत यांच्या पश्यात शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

ज्या अर्थी सर्व जनतेस व हितसंबधीताना या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की उपरोक्त अर्जदार मयत रामराव पि. संतूकराव रूईकर यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी तो स्वत:ता न्यायालयात दिनांक २१/ ६ / २०२५ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.आज दिनांक ०५/२०२५ रोजी माझा सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

**आदेशावरून**

**क.लिपीक** **स.अधिकक्ष**

**दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड**

बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी मर्या.बुलडाणा
र.नं.२६७ (मल्टीस्टेट) शाखा :- नांदेड मेन

## जाहिर नोटीस

(आर्बीटेशन ॲड कन्सीलेशन ॲक्ट १९९६ चे कलम ८४ प्रमाणे कारवाई करण्यापुर्वीची कर्ज वसुलीची अंतीम नोटीस)

नोटीस घेणार :-१) श्री उत्तम बापुराव खांडेकर (कर्जदार)पत्ता:-C/0 24 मेडीकल शिवाजीनगर नांदेड २) दिलीप हरीभाऊ माहोरे(जमानतदार) पत्ता- C/0 सिटी मॅक्स डिजीटल शिवाजीनगर नांदेड ३) संगीता उत्तम खांडेकर(जमानतदार) पत्ता:C/0 24 मेडीकल शिवाजीनगर नांदेड

नोटीस देणार :बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी, मर्या.बुलडाणा र.नं.२६७ तर्फे शाखा व्यवस्थापक शाखा नांदेड मेन

आपणांस या जाहिर नोटीस दवारे कळविण्यात येते की, आपण नोटीस देणार संस्थेच्या नांदेड मेन शाखेवरून दि. ३१/७/२०२० रोजी रू.३००,०००/- चे वैयक्तीक कर्ज घेतले असुन आपण नोटीस घेणार नं २ ते ३ हे कर्जास जमानतदार आहात. कर्ज घेतेवेळी आपण नोटीस घेणार नं. २ ते ३ यांनी जमानतदार म्हणुन व आपण नोटीस घेणार नं. १ यांनी कर्जदार म्हणुन आवश्यक ते दस्तावेज करून दिले आहेत. मात्र आपण नोटीस घेणार यांनी कराराप्रमाणे कर्जाच्या रकमेची परतफेड न केल्याने सदर कर्ज थकीत झाले असुन दि. ३१/३/२०२५ रोजी रू. ४८१५६०/- व्याजासह वसुल करणे बाकी आहे. आपण नोटीस घेणार कर्ज घेतेवेळी दिलेल्या पत्त्यावर कर्ज वसुलीची नोटीसची बजावणी न झाल्यामुळे या जाहीर नोटीसने आपणांस कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासुन १५ दिवसांचे आत आपण कर्जाच्या संपुर्ण रकमेचा भरणा न केल्यास आपणा विरूध्द आर्बीट्रेशन ॲड कन्सीलेशन ॲक्ट १९९६ चे कलम ८४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. अशा परिस्थितीमध्ये होणा-या सर्व खर्चाची व परिणामाची जबाबदारी आपली राहील ह्याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- नांदेड.

**शाखा व्यवस्थापक**
**बुलडाणा अर्बन को-ऑप क्रे.सो. मर्या बुलडाणा**
**शाखा नांदेड मेन ता.जि. नांदेड**








# गोदातीर समाचार








# सांगवी आसना ते मल्हार चौक बायपासचे तीनतेरा

## दोन वर्षांपेक्षा जास्त काळापासून रस्त्याचे काम संथगतीने सुरू : खड्डयांमुळे अपघातांना निमंत्रण

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरासाठी भविष्यातील एक महत्वपूर्ण रस्ता असलेल्या सांगवी आसना ते तरोडा बु. बायपास या रस्त्याचे काम मागील दोन–अडीच वर्षापूर्वी सुरू झाल्याने या भागातीन नव्याने रहिवाशी झालेल्यांना मोठा दिलासा मिळाला होता. कारण एकाच वेळी सेंट्रल ड्रेनेज लाईन व सिमेंट रोड सोबतच नाल्या असे काम सुरू होऊन ते पूर्णत्वास जात असल्याचे चित्र दिसून येत होते. परंतु गेल्या २ वर्षापेक्षाही जास्त काळापासून रस्त्याचे काम संथगतीने सुरू असून खड्डयांमुळे अपघातांना निमंत्रण होत आहे.



उत्तर विधानसभा मतदार संघाचे आ. बालाजीराव कल्याणकर यांनी या रस्त्यासाठी मोठा निधी मंजूर करून आणला. या भागाच्या शाश्वत विकासासाठी महत्वपूर्ण असणाऱ्या आसना बायपास रस्त्याची निमिर्तीस मूर्त स्वरूप देत याभागातील नव्याने विकसित होणाऱ्या वसाहतींतील रहिवाशांच्या आशा पल्लवित केल्या होत्या. मागील दोन–अडीच वर्षापूर्वी सुरू झालेल्या या रस्त्याचे काम काही ना काही कारणास्तव संथगतीने होत राहीले व पूर्ण होता होता हा रस्ता अपूर्णच असल्याने या भागातील रहिवाशांच्या आशेवर पाणी फेरले आहे.

एकंदरीत या भागातील एक मोठा वर्ग हा आ. कल्याणकरांना माननारा असून त्यांनी केलेल्या विकास कामांवर येथील जनेतेनेही त्यांना साथ देत दाद दिली आहे. त्याबळावरच राहिलेला अपूर्ण रस्ता आ.कल्याणकर हे जातीने लक्ष देत पूर्णत्वास नेतील, अशी आशा या भागातील रहिवाशी व्यक्त करतांना दिसून येत आहेत.

**आ.कल्याणकर यांनी जातीने लक्ष घालण्याची गरज**

सांगवी आसना ते मल्हार चौक बायपास हा आमदार कल्याणकर यांच्या पुढाकारातून आकारास आलेला एक महत्वपूर्ण रस्ता आहे. रखडलेले रस्त्याचे काम ते पुन्हा एकदा स्वतः लक्ष घालून पूर्णत्वास नेतील अशी अपेक्षा आहे. तसेच अपूर्ण रस्त्यामुळे होणारे अपघात टळतील. त्यामुळे आ.कल्याणकरांनी या भागातील जनतेचा महत्वाचा प्रश्न सोडवावा.

**–तुळशीदास कोकाटे,**
**सांगवी बायपास, नांदेड**

# अवैध वाळू प्रकरणात अनियमित्ता केल्याने लोह्याचे तहसीलदार आणि तलाठ्याची होणार विभागीय चौकशी

**नांदेड (प्रतिनिधी) –** तालुक्यातीलयेळी वाळू घाटावर अवैध वाळू जप्ती प्रकरणात अनियमित्ता केल्याची तक्रार केल्यानंतर वरिष्ठ पातळीवरून लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर आणि तलाठी यांची विभागीय चौकशी लावण्यात आली आहे. राज्य शासनाच्या कक्ष अधिकारी श्रद्धा नगर यांनी याबाबत आदेश जारी केल्याने महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

लोह्याचे तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी शासकीय कामकाजात अनियमितता केल्याचे चौकशीत आढळून आले. त्यांच्या समवेत तत्कालीन मंडळ अधिकारी आर. बी. कोल्हे आणि तलाठी संदीप कल्याणकर यांचाही सहभाग होता. परंतु ३१ डिसेंबर २०२४ रोजी मंडळ अधिकारी आर. बी. कोल्हे सेवानिवृत्त झाल्याने ते या चौकशीच्या फेऱ्यातून बचावले आहेत.

लोहा तालुक्यातील येळी येथील अवैध वाळू उपसा व रेती साठयाच्या अनुषंगाने नांदेड येथील शेख एजास शेख बाबू यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कंधार यांच्याकडून दि. ८ एप्रिल २०२१ रोजी चौकशी अहवाल सादर करण्याचे कळविले होते. उपविभागीय अधिकारी कंधार यांनी दि.३ जून २०२१ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार येळी येथील सन २०१९ मध्ये १७४४ ब्रास रेती साठा जप्त करण्यात आला होता. अहवालानुसार येळी येथील अवैध वाळू उपसा व रेती साठा होणार नाही या दृष्टीने तहसीलदार लोहा विठ्ठल परळीकर यांनी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तसेच अधिनस्त तलाठी व मंडळ अधिकारी यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवून अवैध रेती उपसा व साठा होणार नाही यादृष्टीने संबंधीता विरुध्द कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदर अवैध रेतीसाठा होण्यास तहसीलदार हे जबाबदार असल्याचे स्पष्ट झाले होते.

जप्त रेतीसाठा लिलाव करुन विक्री करण्याची परवानगी दि.२३ जूलै २०१९ व दि.३१ जूलै २०१९ नुसार देण्यात आली. तथापि लिलावाची तिसऱ्या फेरीत दि.२० आक्टोबर २०१९ अखेर जप्त रेतीसाठा लिलावात गेला नाही.

येळी येथील जप्त रेतीसाठ्याच्या अनुषंगाने १७४४ ब्रास बाबत या कार्यालयाची नोटीस दि.२५ जून २०२१ नुसार तत्कालीन तहसीलदार लोहा यांचा खुलासा मागविण्यात आला होता. सदर नोटीसच्या अनुषंगाने विठ्ठल परळीकर यांनी कोणताही खुलासा सादर केलेला नव्हता. यावरुन विठ्ठल परळीकर यांनी वरिष्ठांच्या पत्रव्यवहाराकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले होते.

तलाठी व मंडळ अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित न करणे, जप्त रेतीसाठा लिलावासाठी प्रयत्न न करणे, कारणे दाखवा नोटीसचे उत्तर न देणे यावरुन वरिष्ठांच्या पत्रव्यवहाराकडे दूर्लक्ष करीत असल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे परळीकर दोषी आढळून आले.




**नांदेड** : भाजप महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांच्या कार्यालयाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सोमवारी रात्री उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, खा. अशोकराव चव्हाण, खा. अजित गोपछडे, महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, संजय कौडगे, विजय येवनकर, चैतन्यबापू देशमुख आदी दिसत आहेत.

# महावितरण सेलू विभागाचे कार्यकारी अभियंता निलंबित

**नांदेड (प्रतिनिधी)–** सेलू विभागाचे महावितरण कार्यकारी अभियंता उमेश धोंगडे यांचे वसूलीत उद्दिष्ट पूर्ण न करणे व आपतकालीन परिस्थितीत विना परवाना गैरहजर राहणे आदी कारणास्तव मंगळवारी त्यांना महावितरणने निलंबित केले आहे.

सेलू विभाग (जि. परभणी) येथील महावितरणचे कार्यकारी अभियंता उमेश विश्वनाथ धोंगडे यांनी ५० हजार ते एक लाख रूपये थकबाकीदारांची थकबाकी वसूलीत दिरंगाई केली. तसेच त्यांच्या अधिपत्या खालिल अधिकारी व कर्मचारी यांच्यावर नियंत्रण नसणे. वरिष्ठांच्या सूचनांचे पालन न करणे व आपात्कालिन परिस्थितीत विना परवानगी गैर हजर राहणे यासह अन्य कारणास्तव त्यांना निलंबित करण्यात आले आहे. महावितरण नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता यांनी मंगळवारी दि. २७ रोजी कार्यकारी अभियंता उमेश विश्वनाथ धोंगडे यांना निलंबित केले आहे.

# ज्येष्ठ नेते हरिहरराव भोसीकर यांना काँग्रेस कार्यालयात श्रध्दांजली



**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हरिहरराव भोसीकर यांचे मंगळवार दि. २७ रोजी रोजी दु:खद निधन झाले. त्यानंतर शहर व जिल्हा काँग्रेस कार्यालय येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

यावेळी खा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेंद्र घोडजकर, श्याम दरक, राजेश पावडे, सुरेश गायकवाड, अनिल मोरे, आनंद चव्हाण, यशपाल भिंगे, पप्पू पाटील कोंडेकर, महेश देशमुख तरोडेकर, सतिश देशमुख तरोडेकर, मसुद खान, प्रफुल्ल सावंत, बालाजी चव्हाण, सुरेश हटकर, डॉ. रेखाताई चव्हाण, डॉ. करुणा जमदाडे, बापूसाहेब पाटील, मुन्ना अब्बास, मुन्तजिब, जेशिका शिंदे, माधव पवळे, गणेश पाटील, दिपकसिंग हजुरीया, गगन यादव, महेश शिंदे, अनिल कांबळे, संजय वाघमोरे, गणेश कोकाटे उपस्थित होते.






**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com